# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
| **EE/CGRF/LTR/ 81** | | **Date :- 31.08.2018** |

**ग्राहक तक्रार क्र.** : ११/२०१८
**तक्रार दाखल दिनांक** : २१.०५.२०१८

**प्रति,**

१. **श्री. आकाश खडू उद्योग,**
B-89 अतिरिक्त, एम. आय. डी. सी. लातूर,
जि. लातूर. ४१३५१२

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं. ग्रामीण उपविभाग, लातूर

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. ११/२०१८ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन श्री. आकाश खडू उद्योग, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

Sd/-
31/8

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**

१ मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**

१. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय, लातूर
२. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, लातूर



Scanned by CamScanner

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक** : ११/२०१८
**ग्राहक तक्रार दाखल दिनांक** : २१.०५.२०१८

**श्री. आकाश खडू उद्योग,**
**B-89 अतिरिक्त, एम. आय. डी. सी. लातूर,**
**जि. लातूर. ४१३५१२**

**--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. ग्रामीण उपविभाग, लातूर** **-- गैरअर्जदार**

| **कोरम :** | **माणिक व्ही.येवतीकर** | **अध्यक्ष** |
|---|---|---|
| | **एस. आर. कुलकर्णी** | **सचिव** |
| | **सुधीर भाऊराव देशमुख** | **सदस्य** |

**निकाल** **दि.३१.०८.२०१८**

ग्राहक अर्जदार, श्री. आकाश खडू उद्योग, B-89 अतिरिक्त, एम. आय. डी. सी. लातूर, ग्राहक क्र.६११२१०१०९२१७ (Commercial Tarrif) यांनी त्यांची तक्रार अ फॉर्ममध्ये दि. २१.०५.२०१८ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे व त्यांचे गाऱ्हाणे खालीलप्रमाणे आहे.

त्यांना डिसेंबर २०१६ पासून घरी बसून अंदाजे रिडिंग टाकणे व मार्चला जादा बिल देणे असे दोन वर्षापासून चालू आहे. याची विचारण केली असता मिटर बंद आहे म्हणून एप्रिल २०१८ ला मिटर बदलला व मार्च २०१८ या महिन्याचे बिल रु. ३६५३०/- (३२३५ युनिट) एवढे दिले आहे. ग्राहकाने प्रत्येक महिन्याला बिल भरले असताना हे जादा बिल कशासाठी अशी मागणी केली आहे.

महावितरणच्या म्हणण्याप्रमाणे सुरवातीचे रिडिंग डिसेंबर २०१६ मध्ये ३९६३ एवढे होते व मिटर बदलताना मार्च २०१८ मध्ये ते ७७३० एवढे आढळले, म्हणजे ३३६७ युनिट वापरले गेले नवीन मिटरचा १०० युनिटचा वापर असून डिसेंबर २०१६ ते मार्च २०१८ या काळात सरासरी दरमहा २१७ युनिटचे बिल (३३६७+१००=३४६७ युनिट) आकारुन रु. ७३८०/- एवढी वजावाट देण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्राहकाने जुलै २०१८अखेरचे दुरुस्ती बील रु. ४४७३०/- भरणे आवश्यक आहे.

अर्जदारास डिसेंबर २०१६ ते मार्च २०१७ याकाळात दरमहा ५० युनिट, एप्रिल ते ऑगष्ट २०१७ या काळात दरमहा ३० युनिट, सप्टेंबर २०१७ मध्ये १३२ युनिट, तर ऑक्टोंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या काळात दरमहा २२ युनिटचे बिल गेले आहे. ऑक्टोंबर २०१७ मध्ये मागील रिडिंग ४१९५ एवढे असून RNT म्हणून २२ युनिटचे बिल दिले आहे. तर नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या काळात चालू व मागील रिडिंग ४१९५ एवढे दाखवून २२ युनिटचे बिल दिले आहे.



Scanned by CamScanner

या प्रकरणाची सुनावणी दि. २१. ०८.२०१८ रोजी घेण्यात आली महावितरण तर्फे श्री. एस. जी. रेड्डी, उपकार्यकारी अभियंता व श्री. ए. आय. दंडेवार, सहाय्यक लेखापाल, लातूर ग्रामीण उपविभाग हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की, जानेवारी २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या काळात ग्राकाचे रिडिंग न घेता अंदाजे रिडिंग दर्शवून कमी रकमेचे बिले गेल्याचे दिसून येते. ग्राहकाचे रिडिंग मिटर बदलताना उपल्बध झाले. ग्राहकाचा पूर्वीचा वापर दरमहा २२० युनिटच्या आसपास आहे. त्यामुळे ३४६७ युनिटचे बिल मागील १६ महिन्यात (डिसेंबर २०१६ ते मार्च २०१८) असे सरासरी २१७ युनिट प्रमाणे विभागून देण्यात आले आहे. यावर ग्राहकाचा वापर पाहता त्यांना मे ते ऑगष्ट २०१८ या काळात अनुक्रमे ६३४, २५६, २५० व १७१ युनिटचे बिल गेलेले आहे.

त्यावेळी ग्राहक उपस्थित नसल्याने त्यांची सुनावणी दि. २८.०८.२०१८ रोजी घेण्यात आली. या सुनावणीस श्री. संदीपान रामराव माने उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की, डिसेंबर २०१६ पासून त्यांना प्राप्त झालेल्या बिलावर पूर्वीचे व चालू रिडिंग ४१९५ असे दर्शविले आहे. त्यांनी दरमहा बिल भरलेले आहे. त्यांनी जादा बिलासंबंधी विचारणा केली असता रिडिंग अंदाजे घेतले होते व मिटर बंद आहे असे सांगितले. त्यामुळे आलेले बिल हे अन्यायकारक आहे. रिडिंगचा फोटो बिलावर घेतलेला नाही व ते एप्रिल २०१८ या महिन्याचे अतिरिक्त बिल भरु शकणार नाहीत.

अर्जदाराचे रिडिंग दरमहा न घेतल्याने अर्जदारास १६ महिन्यानंतर रिडिंग घेऊन बिल दिल्याचे मंच्याच्या निदर्शनास आले आहे. हे विभागून दिलेले बिल अर्जदाराच्या पूर्वीच्या व नंतरच्या सरासरी वापराशी सुसंगत आहे. त्यानुसार मंच खालीलप्रमाणे आदेशित पारित करत आहे.

## आदेश

१) अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदारास १६ महिन्याच्या सुधारित बिलाचे संचालक (संचलन) यांचे पत्रक्रमांक PR-3/Tarrif/ 24156 Dt. 18.07.2009 नुसार १६ समान हप्ते पाडून देण्यात यावेत. त्यावर दंड व व्याज लावू नये.

३) कृतीच्या मानकांची पुर्तता न केल्यामुळे म्हणजेच ग्राहकाची रिडिंग दोन महिन्यातुन एकदा न घेतल्यामुळे अर्जदारास प्रतिमहा २०० रु. अशी १४ महिन्याची २८०० रु. नुकसान भरपाई देण्यात यावी.

ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर
दिनांक :- ३१.०८.२०१८

31/8/2018 — 31-8-2018 — 31-८-२०१८

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर |



Scanned by CamScanner